**<u>दिवाणी किरकोळ अर्ज कमांक २२/१८.</u>**
**<u>सय्यद खयुम वि. निरंक.</u>**

## <u>निशाणी कमांक १ वर आदेश</u>

**(१)** प्रस्तुत अर्ज वारसा हक्क प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणे करीता आहे. प्रकरणामध्ये वारंवार पुकारा केला असता अर्जदार व गैरअर्जदार अनुपस्थित. उभय पक्षकाराचे विधीज्ञ गैरहजर कोणताही लेखी अर्ज न्यायायलयास सादर केलेला नाही. जाहिर प्रगटण प्रसिध्द झाल्यानंतर सामनेवाला विधिज्ञासह हजर झाले. अर्ज मंजुरीस जोरदार हरकत नोंदविली.

**(२)** आदेशीका १ नियम १० प्रमाणे सादर केलेला अर्ज मंजुर करुन नि. १४ मधील अर्जदारास सामनेवाला पनामध्ये समाविष्ठ करण्याचे आदेशीत, दुरुस्ती प्रत सादर करण्याचे आदेशीत तसेच अर्जामध्ये दुरुस्ती करण्याचे कळविले तथापि, आदेशीत बाबींची पुर्तता नाही. दिनांक १७/०३/१८, २३/०३/१८, १३/०४/१८ व २३/०४/१८ रोजी प्रकरण ठेवले तथापि अर्जदार व त्यांचे विधीज्ञ अनुपस्थित. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ९ नियम ३ प्रमाणे अर्ज सुनावणीसाठी पुकारला जाईल तेव्हा, कोणताही पक्षकार उपस्थित राहिला नाही तर, प्रकरण फेटाळण्यांचा आदेश देण्याचा अधिकार न्यायालयास आहे. करीता आदेश.

## <u>आदेश</u>

**१.** आदेशीत बाबींची पुर्तता अर्जदार करत नाहीत, उपस्थित राहत नाहीत करीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ९ नियम ३ प्रमाणे प्रस्तुत अर्ज फेटाळण्यात येत आहे.

**२.** खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

( गणेश अं. घुले )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
<u>हदगांव.</u>
<u>जिल्हा नांदेड</u>

दिनांक :- २३/०४/२०१८.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

लिपिकाचे नाव - श्री. शेवंडकर
न्यायालयाचे नाव - सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग १, हदगांव.

| | |
|---|---|
| आदेश दिनांक | :२३/०४/२०१८. |
| पिठासीन अधिका-यानी स्वाक्षरी केलेली तारीख | :२३/०४/२०१८. |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख | :२३/०४/२०१८. |